ISSN 2278-8808 SJIF 2016: 6.177
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# संशोधनात संकल्पना चित्रणाचे उपयोजन

डॉ. संजीवनी राजेश महाले[1], श्री. राहुल दत्तात्रय ढेरे[2] & श्रीमती विद्यादेवी भला बागुल[3] *(Page 120-124)*

*[1]प्र. संचालक, सहयोगी प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक*
*[2]पीएच.डी. विद्यार्थी*
*[3]पीएच.डी. विद्यार्थीनी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक*

SRJIS IMPACT FACTOR SJIF 2016: 6.177
Date of Issue Release: 04/05/2017,
Volume: SRJIS, Mar-Apr, 2017, 4/31

*ABSTRACT*

***अर्थपूर्ण अध्ययन होण्यासाठी संकल्पनांचा परस्परसंबंध लक्षात घेऊन त्याची सांगड पूर्वज्ञानाशी घातली जाते. संकल्पना चित्रण हे मनोचित्रणापेक्षा वेगळे आहे. संकल्पना चित्रणाचे कृतीनुसार विविध प्रकार केले जातात. संशोधन विषय निश्चितीपासून ते अहवाल लेखनापर्यंत विविध टप्प्यांमध्ये संकल्पना आरेखन संशोधकाला दिशा देण्याचे काम करते. संकल्पना आरेखनाची सवय झाल्यास व्यक्ती प्रत्येक कृती त्यापद्धतीने करण्यात सुरुवात करते. त्यामुळे एका दृष्टीक्षेपात कामाचा आवाका लक्षात येतो. कामाचे नियोजन व आयोजन करून प्रत्येक कार्यात यश संपादन करता येते.***

***महत्त्वाचे शब्द : संकल्पना चित्रण, मनोचित्रण, मालिका चित्रण, श्रेणीबद्ध चित्रण, ओघतक्ता चित्रण, प्रणाली चित्रण.***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

मानवाच्या सभोवताली विविधांगी प्रकारची माहिती उपलब्ध आहे. ही माहिती मनात विशिष्ट पद्धतीने साठवली गेल्यास त्यांच्यातील परस्परसंबंध, श्रेणीबद्ध रचना स्मरणात राहते. कोणतीही व्यक्ती नवीन ज्ञानाची प्राप्ती झाल्यानंतर त्या ज्ञानाची पूर्वज्ञानाशी सांगड घालते. व्यक्ती गरजेनुसार पूर्वज्ञानाच्या संरचनेत बदलही करतो. ह्या सर्व क्रिया अमूर्त